# University of Mumbai

**अत्यंत महत्वाचे**

परीक्षा विभाग,
पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०००९८


**क्र.परीक्षा/पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/ २८५ /२०१८.**

**परिपत्रक :—**

विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक **क्र. परीक्षा/पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/४०/२०१८, दि. २८ मार्च, २०१८ अन्वये** एप्रिल/मे, २०१७ मध्ये घेतलेल्या अभियांत्रिकी पदवीच्या सत्र— १,२,७ व ८ या परीक्षांमध्ये Revaluation तसेच Grievances मध्ये उत्तीर्ण झाल्याबाबतचे पत्र विद्यार्थ्यांकडून तसेच विद्यापीठातील कर्मचाऱ्यांकडुन हस्तेपोच/टपालाने आपल्याकडे प्राप्त झाल्यानंतर सदर पत्र विद्यापीठातील उपकुलसचिव/सहायक कुलसचिव, पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, रूम नं. ४७, दुसरा मजला यांच्याकडुन पडताळणी करूनच ग्राहय धरावे व यांनतर पुढील कार्यवाही करावी असे कळविण्यात आले होते.

उपरोक्त परिपत्रकाला अनुसरून अद्यापही बऱ्याचशः महाविद्यालयांकडुन कार्यवाही झालेली नाही असे निदर्शनास आलेले आहे.

तरी आपणासर्वांना पुनश्चः विनंती करण्यात येते की, ज्या महाविद्यालयांनी अद्यापही उपरोक्त प्रमाणेच्या पत्रांची पडताळणी करून घेतलेली नाही किंवा अनावधाने पडताळणी करणे राहून गेलेली आहे, त्यांनी उपरोक्त प्रमाणेच्या पत्रांची पडताळणी हे परिपत्रक मिळाल्यापासुन १५ दिवसांच्या आत विद्यापीठातील उपकुलसचिव/सहायक कुलसचिव, पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, रूम नं. ४७, दुसरा मजला यांच्याकडे हस्तेपोच सादर करून समक्ष करून घेऊनच पुढील कार्यवाही करावी.

तसेच आपल्या सर्वांच्या निदर्शनास आणून देण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यास आपल्या महाविद्यालयांकडुन दिरंगाई झाल्यास व यामुळे भविष्यात यासंबंधी काही प्रशासकीय/तांत्रिक/न्यायालयीन बाबी उद्‌भवल्यास त्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

मुंबई — ४०००९८.
दि. ०५ मे, २०१८.

प्रा.(डॉ.) अर्जुन घाटुळे
प्र. संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व अभियांत्रिकीच्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक

अ. प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:—

१. सर्व वरीष्ठ यंत्रणा नियोजक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
२. सर्व यंत्रणा परीचालन अधिकारी, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
यांना विंनती करण्यात येते की, त्यांच्याकडे उपरोक्त प्रमाणेचे पत्र गुणपत्रिका छपाईसाठी आल्यानंतर त्यांनी सुध्दा वरील प्रमाणे प्रक्रिया करून छपाई संदर्भात पुढील कार्यवाही करावी.

ब. प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:—

१. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग
२. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग

क. प्रत माहितीसाठी अग्रेषित:—

१. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई —४०० ०३२.
२. मा. प्र. कुलगुरू, मा. कुलसचिव व मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक